# आरंभाचे चार शब्द.

वीर रत्न मुरारबाजी यांचे पोवाड्याची पहिली आवृत्ती लौकरच संपल्यामुळें दुसरी आवृत्ती जनता जनार्दनाचे पुढें ठेविण्याची संधी प्राप्त झाली याजबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. या पुस्तकास सर्व कागद पूर्ण स्वदेशी वापरला असून, याकामी ज्यानी ज्यानी थोर अंतःकरणानी वेळो वेळीं मदत केली आहे त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. त्याच प्रमाणें माझे मित्र श्री. नाचणे वकील जळगांव यांचे सक्रीय सहानुभूतीनेंच दुसऱ्या आवृत्तीचा योग आला. त्यामुळें मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. अशा सन्मित्रांच्या मदती मुळेंच याकामीं मला अत्यंत उत्साह वाटत आहे. परमेश्वर माझी मनीषा पूर्ण करो हेंच मागणें आहे.

सर्वांचा कृपाभिलाषी,

प्रल्हादराय

# थोरांचे आशिर्वाद.

**महाराष्ट्र शाहीर कवि तिवारी म्हणतात.-**

जुन्या पोवाड्याची वेधक चाल व सोपी रचना यामुळे श्री. जामखेडकर यांचा मुरारबाजीवरील पोवाडा सामान्य जनांसही समजण्या सारखा आहे. जुन्या पोवाड्यावर व्याकरण व साहित्य शास्त्राची दृष्टी कोणी टाकीत नाहींत. रसैक दृष्टीनेंच त्याकडेस सर्व पाहतात तीच दृष्टी याही पोवाड्यास लावणे इष्ट आहे. ऐतिहासिक कवितेचें हें मुख्य लक्षण आहे कीं, तिनें तो तो ठळक रीतीनें वाचकांस भासावला पाहिजे या कळेची साधनें अनेक असूं शकतील परंतु शाहिराची विषय तद्रूपता हें त्यांतील पहिले साधन होय, हें साधन ज्या प्रमाणांत तेजस्वीं असेल त्या प्रमाणांत शाहिरी कविता लोकप्रिय होते श्री. जामखेडकर यांची गेल्या वर्षांच्या गणेशोत्सवांतील आणखीही कांहीं पद्यें ऐकिली ती आकर्षक होती अजूनही मुलांच्या तोंडीं तीं तीं चरणें घोळक असतात सदरच्या पोवाड्यांतहि त्यांचा तो गूण उत्तम उतरला आहे.

दु. आ. तिवारी.

जळगांव

ता. १७-६-३०

श्री. प्र. रं. जामखेडकर शाहीर कवि यांनीं आपला मुरारबाजी वरील वीररस प्रधान पोंवाडा स्वतः ह्मणून दाखविला सदरहू पोंवाडा जुन्या पोंवाड्याच्यो धर्तीवर रचिला असून प्रसंगाला अनुसरून त्याची भाषासरणी आहे अशा रीतीने शाहिरी काव्याचे पुनरूज्जीवन झाल्यास हल्लींच्या महाराष्ट्र वाङ्मयांत खात्रीनें भर पडेल सदरहू शाहिरांचा हा प्रयत्न स्तुत्य असून लोकदारास पात्र होईल अशी आह्मांस आशा आहे. × ×

जळगांव

ता. ५–३–३०

नाथ निफाडकर.

के. म. सोनाळकर.



जय हिंदमाता

# शाहिरी पुष्प-माला.

पुष्प १ लें.

## वीर-रत्न मुरारबाजी यांचा पोवाडा.

शाहीर कं. जामखेडकर.

### नमन

आदि नमन गौरि नंदना । सरस्वती । चरणा सरवती चरणा ।
देवी सह येऊनि द्यावी मती मज कवना ॥ जी जी जी
मग नमिन हिंद जननीला । राष्ट्र मातेला । भरत भूमिला ।
झटा तिच्या कार्यी विनती ही सकला ॥ जी जी
ज्ञानोबाराय तुकारामाला । रामदासाना । रामदासाना ।
ज्यानि चेतविला राष्ट्रीय विर बाणा ॥ जी जी
उमाबाई जिजामातेला । लक्ष्मीबाइना । वीर माताना ।
सावित्रिबाईला शाहीर करि नमना ॥ जी जी जी

पृथुराज प्रतापसिंहाना । आणि शिवचरणा । आणि शिवचरणा ।
ज्यानि स्थापिल राज्य बुडविल यवना ॥ जी जी
तानाजि नेताजी आदि वीरांना । मुरारबाजीना । प्रल्हादपंताना ।
ज्यानि यवनासि दाविला मराठी बाणा जी जी जी
संभाजी राणा संताजी । धनाजी रावाना । राजारामाना ॥
ज्यानि कठिण काळीं रक्षिल आर्य धर्माला ॥ जी जी जी
बाजिराव माधवरावाना । भाऊ पेशव्याना । विश्वासरावाना ।
राघोभरारीला बोलाविन त्याना यात्रया कवाना जी जी
शिंदे होळकर गायकवाडाना । विंचूरकरांना । नारोशंकराना ।
ज्यानि फोडल दिल्लीच्या यवना तक्ताला ॥ जी जी जी
नाना पेशवे तात्या टोपीना । बापुगोखल्याना । लालुबक्षीना ।
ज्यानि दिला प्राणप्रसंगि आर्यभू चरणा ॥ जी जी
अगरकर विष्णु शास्त्री बाळटिळकांना । लोकमा याना लोक०।
ज्यानि दाविला मार्ग नीट हिंद पुत्रांना ॥ जी जी
दयानंद विवेकनंदाना । लेखरामजीना । श्रद्धानंदाना
ज्यानिदिला प्राणप्रसंगि धर्मरक्षणा ॥ जी जी जी
चापेकर सावकरांना । कान्हेरे वर्ऱ्याना । नासिककरवीराराना ।
ज्यानि कारागारि सोशिल कष्ट सोडल भोगाना ॥ जी जी
आतां नमिन लालाजी दास बाबूना । नेहरू द्वयांना ।
पितापुत्रांना । मालविय मुंज खाडिलकर देशभक्ताना ॥ जी

नंतर नमिन शांतिब्रिद । महात्मागांधीना । असहयोग्याना ।
ज्यानि दाविला मार्ग शांततेचा जनतेला ॥ जी जी
आणि नमिन शिवरामंपताना । केळकराना । तात्या रावाना ।
टिळक भक्ताना द्याहो आर्शिवाद या कवना ॥ जी जी
सरत नमन साऱ्या देशभक्ताना । राष्ट्रवीराना । श्रोतृवृंदाना
कृपादृष्टी ठेवा प्रल्हाद गातो कवना ॥ जी जी

---

## वीर–रत्न 'मुरारबाजी' [पोंवाडा]

### शाहीर कॅ. जामखेडकर.

[ चालः– ॐ नमो शंभो शिवहर. ]

**चौक १ ला.**

धन्य धन्य मराठे वीर । युद्ध धुरंधर । जगिं महशूर ।
प्रतापी मुरारबाजी अभिधान । गाजे डंका शौर्याचा छान ।
श्रोते हो द्या जरा अवधान ॥ जी जी
मोंगलान केल बेजार । देशी अनाचार । वाढला फार ।
राज्य करी दिल्लीच्या तक्ताला । थोर मुत्सद्दी सहाऱ्याला ।
अनुसरे कुटील नितीला ॥ जी जी
देश बंधुहो चला त्या स्थला । मंगल कार्याला । शत्रु हननाला ।
हिंदमातेची दैना हरण्यास । धरारेधरा लाज समयास ।
स्मरारे जरा इतिहासास ॥ जी जी

( चाल नं. १ ) परदास्य शृंखला भार । तोडून होऊं
आम्ही पार ।। जी जी
( चाल नं. २ ) आज ऐकविंतो तुम्हाला ।
पुरंदरच्या घोर युद्धाला ।
बाजिच्या थोर शौर्याला ।
अनुसरा युध्द शास्त्राला ।
पावाल जगीं धन्यतेला ।
करा मुक्त हिंद मातेला ।
आठवोनि शंभो शिवहर गर्जना करा घनघोर ।। जी जी

[ मिळवणी ]

मुरारबाजी बोले समयाला । सोडुनि भयाला । चला कार्याला ।
धरारे धरा कांहीं तरीं लाज । उतराहो दुष्ट रिपुचा माज ।
कां बसला षंढापरि आज ।। जी जी

**चौक २ रा.**

यवनान धरल कृपाण । दुजाहाति कुराण । केल त्यान हैराण ।
हिंदु धर्मास नष्ट करण्यास । आला आडवा हो मराठा त्यास ।
म्हणून लढवय्ये म्हणू आम्हीं त्यास ।। जी जी
शिव भोसला मर्द सरदार । केला कारभार । जमल ल्हान थोर ।
हरिती त्या दुष्ट म्लेंच्छांचा त्रास । बांधिती कोट आणि किल्यास ।
त्यांचा वाढला फार उल्हास । जी जी



दिल्लीच्या औरंगजेबाला । अती क्रोध आला । मनीं बेत केला ।
म्हणे कपटानें धरा शिवबास । देऊं जयसिंगासवे खानास ।
शिवशाहि नष्ट करण्यास ।। जी जी

( चाल नं. १ )

घ्या पुरंदर किल्यास । वेढा घाला अवचित त्यास । जी जी
वेढा दिला पुरंदरास । तोफा रोखून ठेवल्या कोठास ।। जी

( चाल नं. २ ) मुरारिने निश्चय केला ।
आहुती टाकिन समयाला ।
गड देणार नाहीं मोंगला ।
नख लावनि त्याचे नरडिला ।
चर चरा कापिन खानाला ।

( चाल नं. १ )

आठवोनि शंभो शिवहर । गर्जना करी घनघोर ।। जी जी
सर्व मराठे वीर । युद्धास पातले थोर ।। जी जी
जणु सजे सेनासागर । संगे घेतील ढाल तलवार ।। जी जी

[ मिळवणी ]

धन्यधन्य मराठे वीर । युद्धधुरंधर । जगीं महशूर ।
प्रतापी मुरारबाजी अभिधान । गाजे डंका शौर्याचा छान ।
श्रोतेहो द्या जरा अवधान ।। जी जी

## चौक ३ रा.

मुरारबाजी करी प्रतिज्ञेला । वारिन जयश्रीला ।
ध्यात्र मुजऱ्याला । साक्ष आई भवानीच्या चरणास ।
स्मरुनिया वदते तुह्मास । ना तरी जाईन स्वर्गास ॥ जी जी
मध्यान रात्र काळोख फार । केला इचार । जाव सत्वर ।
गनिमी काव्यान आधि लढण्यास । सोडल पुरंदर किल्यास ।
शत्रूला नामोहरम करण्यास ॥ जी जी

( चाल नं. १ )

मोंगलांच्या छावणीवर । जणु काळ शिरे अति क्रूर ।
आठवोनि शंभो शिवहर ; गर्जना करी घनघोर ॥ जी जी

( चाल नं. २ ) स्वातंत्र्य शौर्य कार्याला ।
करिती जे अति विघ्नाला ।
देतसे देव शिक्षेला !
वदविती त्या अल्ला अल्ला ।
मराठा कापि म्लेंच्छांला ।
म्लेंच्छांचा वीर कोपला ।
ह्मणे धरा मुरार बाजीला ।
मोंगल लागले पाठीला ।
नवचैतन्य खेळुं लागल त्याच समयाला ॥





कोंडीत आणाव सिंहाला ।
एकच घोष चालला ।
मारामारा दिलेरखानाला ।
करुनिया जिवाचा झेला ।
प्रभुवरा देह वाहिला ।
हर हर महादेव बोला मारा शत्रूला ॥

[ चाल नं. १ ]

यवनांचा अकस्मीत हल्ला । करी पीछेहाट मराठयाला ॥ जी जी
किल्यांत कोंडीले वीर । खानान केल जाहीर ॥ जी जी

[ मिळवणी ]

धन्य धन्य मराठे वीर । युद्ध धुरंधर । जगीं मह शूर ।
प्रतापी मुरारबाजी अभिधान । गाजे डंका शौर्याचा छान ।
श्रोते हो द्या जरा अवधान ॥ जी जी

## चौक ४ था.

दिलेरखान बोले बाजिला । ह्मणे समयाला ।
सोडुनी युद्धाला । यावेहो शरण आजि आह्मांस ।
देतो मालकी हक्क किल्यास । मधाचे बोट लावि तोंडास ॥ जी
बाजिराव अति क्रोधवला । बोले खानाला ।
कुतरड्या तुला । शरम कशी नचये या समयास ।
डिवचुनी नरवीर सिंहास । घालिसी विष्टा कां खाण्यास ॥ जी

( चाल नं. १ )

निर्लज्ज दुष्ट शिरजोर । टाकिशी गरळ अति घोर ।। जी जी
जो लालुच्च वे विनघोर । तो नीच कुळाचा थोर । जी जी
ह्मणवी जो शूर सरदार । तुडविल इंद्रपद थोर ।। जी जी

( चाल नं. २ )

जा निच्या या समयाला ।
समरि ये तूं आधिं लढण्याला ।
तो लगट झालि युद्धाला ।
हरहर बोले शद्वाला ।
दिन दिन घोष चालला ।
बाण जाल अती सुटला ।
ढालेवर वाजतो भाला ।
रणकल्लोळ फार माजला ।

( चाल नं. १ )

तो मराठी भाला शूर । चढविला हल्ला घनघोर ।। जी जी
म्लेंच्छांचा सुटे मग धीर । बाजीनं केलं बेजार ।। जी जी

[ मिळवणी ]

धन्य धन्य मराठे वीर । युद्ध धुरंधर । जगीं महशूर ।
प्रतापी मुरारबाजी अभिधान । गाजे डंका शौर्याचा छान ।
श्रोते हो द्या जरा अवधान ।। जी जी



चौक ५ वा.

मुरारबाजी गर्जे हरहर । कापी चराचर ।
शत्रुभाराभर । मोंगलांचा धुवा उडविला फार ।
जाहला शत्रु सैन्य संहार । धन्य धन्य शूर सरदार ।। जी जी
कोणाचे फोडती डोळे । पोटाचे गोळे । घालुनी भाले ।
काढिती नरड्यातून जिव्हार । ह्मणती त्या दुष्ट नीच यवनास ।
कां आला हिंदु धर्म नाशास ।। जी जी
मोंगलांचा चेंदा मेंदा आला । अल्ला बिसमिल्ला । करुनिया
एक गिल्ला । पळाले जिव धरुनिया हातात । चेंगरुनी मरती
कितीक रस्त्यात । नाहीं जिव कुणाच्या जिवात ।। जी जी
किती यवन हात पायाविण । नाक डोळ्याविण: ।
पळती वणवण । कितीतरी सांगू त्यांची धुळधाण ।
नाहींहो अति फजीतिस वाण । आतां ऐका पुढील वर्तमान ।।
वृत्तांत कळला खानाला । सोडुन युद्धाला ।
टाकुनी शस्त्राला । पळाले सर्व सैन्य रानोमाळ ।
तापला अग्नि जणु ते जाळ । ठैरो ठैरो ह्मणे तात्काळ ।। जी
भ्याडानों मर्द ह्मणवितां । तोंड लपविता । पळुनी कां जाता ।
कुतरड्यावानी शेपुट घालुनी आंत । लढाया परत चला युध्दांत ।
मर्दानो धैर्य धरा ह्रदयांत ।। जी जी
यवन फौज अतीवैतागे । परतली मागे । भरुनिया रागे ।

९८



म्हणती चरचरा कापु गालिमास । घेऊं बदला याच समयास ।
सर्व सैन्य सिद्धझाले युद्धास ॥ जी जी

( चाल नं. १ )

पातला घोर संग्राम । जाहले सर्व बेभान ॥ जी जी
नादिसे मराठा म्लेंच्छांला । शत्रु कां मित्र हा चिरिला । जी
हाणा मारा गर्जना चाले । बाजीला स्फुरण बहु आले ॥ जी

[ चाल नं. २ ] पुन्हा भाला दांत्रि तेजाला ।
पत्र्याचा हात चालला ।
बहुशिरे उडति गगनाला ।
भेदुनी अग्नि अत्राला ।
ऐकुनी रण–वाद्याला ।
हरहर महादेव जयजयकार हो झाला ॥ जी जी

( चाल नं १ )

वीर बाजी लढे आघाडीला । अभिमन्यु बाळ जणु गमला ॥ जी
लागता तोंड युद्धाला । ढालीचा चुरा हो झाला ॥ जी
हरहर घातकी घाला । मुरारीच्या नशिबी आला ॥ जी

[ चाल नं. २ ] हातावर जव्हां वार आला ।
रक्ताने हात बहु न्हाला ।
संकटी वीर गावला ।
पाहिले वाहत्या रक्ताला ।



आठविले भवानी मातेला ।
मानिना अशा संकटाला ।
कमरेचा शेला सोडला ।
लपटिला त्वरे हाताला ।
धन्यधन्य अहो वस्त्राला ।
निर्जिव झटे स्वराज्याला ।
हरहर बोलून पुढें बाजि सरसावला ॥ जी जी
जो खानावर वार केला ।
तो हाय हाय उलटला ।
उलथुनी भूमिवर आला ।
दुसऱ्याच क्षणी उठला ।
अति क्रोधे बोले मराठ्याला ।

[ चाल नं. १ ]

जरि असाल जातीचे शूर । कधिं घेऊं नका माघार ॥ जी
चला लढा मज बरोबर । जरि असाल मर्द खरोखर ॥ जी

( चाल नं. २ ) बेभान शौर्यानें झाला ।
सैन्यांत शत्रुच्या गेला ।
चरचरा कापि यवनाला ।
मानिना प्रबळ सैन्याला ।
धन्य धन्य वीर बाजिला ।

पाहुनी एकटा भला ।
मारिती यवन शस्त्राला ।

( चाल नं. १ )

मागुनि कोणी यवनाने । कांपिले शीर अधमाने ।। जी जी
परि पहा शूर धडानें । तोडिले किती शस्त्रानें ।। जी जी

[ चाल नं. २ ]

मुरारीचा आत्मा बोलला ।
कळवा भले शिवबारायाला ।
स्वामि कार्यीं देह ठेविला ।
नमुनिया शिवचरणाला ।
हरहर बोलुन वैकुंठासि गेला ।। जी जी

[ मिळवणी ]

विरांचे गाता यशोगान । ऐकल प्रेमान । अती आनंदान ।
प्रल्हाद शाहीर होई मनि दंग । बांधाहो मर्दापरि असा चंग ।
ऐकुनी हा समर प्रसंग ।। जी जी

समाप्त.